वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसंदर्भात वैद्यकीय देयकांचा वाजवी खर्च निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## शासन निर्णय क्रमांकः बैठक २०१३/प्र.क्र.३५३/१३/राकावि-२

मंत्रालय जी.टी.हॉस्पिटल कंपाऊंड, १० वा मजला,
कॉम्प्लेक्स बिल्डींग, मुंबई- ४००००१.
तारीखः **०४ एप्रिल, २०१४.**

**वाचा :-**

१) शासन निर्णय, सा.आ.वि. क्रमांकः एम.ए.जी.२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३, दि.१९ मार्च,२००५

२) आरोग्य सेवा संचालनालयाचे पत्र क्र.संआसे/वैखप्र/खर्च निश्चिती समिती/कक्ष-८ब/२०१४ दि. १३ मार्च, २०१४

**प्रस्तावना :-**

शा. नि. सा.आ.वि.दि. १९.०३.२००५ मधील परिच्छेद ३(३) नुसार विहीत तरतुदीत न बसणा-या प्रकरणी काही अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणुन वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मान्यता द्यावयाची असल्यास अशा प्रकरणांवर निर्णय घेण्यासाठी अपर मुख्य सचिव (आरोग्य ) यांच्या अध्यक्षतेखालील समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीमध्ये वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीचा वाजवी खर्च किती याबाबतही काही प्रकरणे समितीसमोर सादर करण्यात येतात. सर्वसाधारणपणे वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या वाजवीपणाबाबत आरोग्य संचालनालयामार्फत जे.जे.रुग्णालयाचे अभिप्राय प्राप्त होतात. परंतु, काही प्रकरणात, प्रत्येक हॉस्पिटलचे दर वेगवेगळे असल्याने वाजवीपणाबद्दल अभिप्राय देणे शक्य नसल्याचे कळविण्यात येते.वैद्यकीय खर्च वाजवी आहे किंवा कसे याबाबत स्पष्ट अभिप्राय नसल्याने अशा प्रकरणी मा.प्रधान सचिव (आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या बैठकीमध्ये निर्णय होऊ शकत नाही. त्यामुळे ज्या प्रकरणात आरोग्य सेवा संचालनालय अथवा जे.जे. रुग्णालय समुह यांचेकडून वाजवीपणाबद्दल स्पष्ट अभिप्राय उपलब्ध होत नाहीत अशा प्रकरणात वैद्यकीय खर्चाचा वाजवीपणा ठरविण्याकरिता एक समिती गठीत करण्यात यावी असे मा. प्रधान सचिव (आरोग्य) यांनी सूचित केले आहे. सदर समितीमध्ये सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये) यांचेसह मुंबईतील अन्य तीन रुग्णालयातील प्रत्येकी १ या प्रमाणे ३ सदस्यांचा समावेश असावा, असे प्रस्तावित होते त्यानुसार उपरोक्त बाबतीत समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

(कृ.मा.प.)

## शासन निर्णय:-

आरोग्य संचालनालयाच्या स्तरावर “वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती संदर्भात वैद्यकीय देयकांचा खर्चाचा वाजवीपणा निश्चित करण्यासाठी” खालील प्रमाणे समिती गठीत करण्यास याद्वारे शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | उप संचालक,रुग्णालये (राज्यस्तर) मुंबई | - | अध्यक्ष. |
| २. | जसलोक हॉस्पिटल, मुंबई येथील संबंधीत आजाराचे तज्ञ डॉक्टर | - | सदस्य. |
| ३. | के.ई.एम. हॉस्पिटल, परेल मुंबई, येथील संबंधित आजाराचे तज्ञ डॉक्टर | - | सदस्य |
| ४. | जे.जे.समुह रुग्णालय, मुंबई येथील संबंधीत आजाराचे तज्ञ डॉक्टर | - | सदस्य |

**२. समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे असेल:-**

अ) सदर समिती वैद्यकीय प्रतिपुर्ती खर्चाचा वाजवीपणा ठरविण्यासंबंधी प्राप्त होणा-या खालील प्रकरणाबाबत समितीच्या बैठकीत चर्चा करुन निर्णय घेईल.

१. आरोग्य सेवा संचालनालयाकडे शासनाकडून प्राप्त होणा-या वैद्यकीय प्रतिपुर्ती खर्चाचा वाजवीपणा ठरविण्याबाबतच्या अनौपचारीक संदर्भाची सर्व प्रकरणे.
२. आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिनस्त कार्यरत क्षेत्रीय कार्यालयांकडून प्राप्त होणा-या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती संदर्भातील प्रकरणांपैकी खर्चाच्या वाजवीपणाबाबत शंकास्पद वाटणारी प्रकरणे.

ब) उपरोक्त प्रमाणे आरोग्य सेवा संचालनालयाकडे प्राप्त झालेल्या प्रकरणांच्या संख्येनुसार सदर समितीने महिन्यातून एकदा किंवा दोनदा बैठक घेवून प्रकरणनिहाय वाजवी खर्च निश्चित करुन त्याप्रमाणे शासनास वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीसाठी शिफारस करावी.

क) खर्चाच्या वाजवीपणाबाबत यापूर्वी प्रलंबीत असलेल्या प्रकरणांच्या बाबतीतही सदर समिती शिफारस करेल.

३. वरिलप्रमाणे स्थापन करण्यात आलेल्या समितीपुढे संबंधीत कर्मचा-यांच्या प्रशासकीय विभागप्रमुखांमार्फत खर्चाच्या वाजवीपणा संबंधीत प्रस्ताव परस्पर सादर करण्यात येतील व समितीच्या शिफारशीनुसार खर्चाच्या प्रतिपुर्तीचे आदेश संबंधीत प्रशासनिक विभागप्रमुख निर्गमित करतील.

४. हे आदेश महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाचे सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, मा.मंत्री, मा. राज्यमंत्री, मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानमंड्ळाचे विद्यमान व माजी सदस्य, उच्च न्यायालयांचे न्यायाधीश व या सर्वांचे कुटुंबिय यांनाही लागू राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०४०४१२५९११८८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Padwal Sunil D

Digitally signed by Padwal Sunil D
DN: CN = Padwal Sunil D, C = IN, S = Maharashtra, O = Govt Of Maharashtra, OU = Public Health Dept
Date: 2014.04.04 16:23:26 +05'30'

**(सु.द.पडवळ)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव, (सर्व) मंत्रालय, मुंबई.
सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई.
सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मुख्यमंत्र्यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
प्रबंधक, मा. लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रबंधक, मा. उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मंबई.
राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मंबई.
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सेटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्डस, पुणे

विभागीय आयुक्त (सर्व), जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
चिफ ऑडिटर, लोकल फंडस अकांऊटस, मुंबई
कोषागार अधिकारी (सर्व)
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
संचालक, वैदयकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
संचालक, आयुर्वेद, मुंबई
संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई
सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
वैदयकीय अधिक्षक, सर ज.जी. समूह रुग्णालय, मुंबई
प्रा. मुत्रपिंड विभाग, ग्रॅन्ट मेडीकल कॉलेज, मुंबई
अधिष्ठाता, शासकीय वैदयकीय महाविद्यालय, (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, (सर्व)

- प्रोथोनोटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई

वित्त विभाग (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.
वित्त विभाग (सवो-५ कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई.

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यात येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनांना पाठवाव्यात. तसेच संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.

निवडनस्ती (राकावि-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* पत्राव्दारे)